विषय : सहकाराचा विकास

भारतातील सहकार चळवळीची ओळख

Introduction to the Co-operative movement in India

प्रा. महादेव कांबळे
सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

सहकार : अर्थ, व्याख्या आणि वैशिष्ट्ये

(Co-operation : Meaning, Definition and Features)

प्रास्ताविक

शहरी आणि विशेषतः ग्रामीण भारतात जेथे शासन पोहोचले नाही तेथे सहकारी क्षेत्र पोहोचले आहे. त्यामुळे सहकार हे ग्रामीण भारताच्या जीवनाचे अंग बनले असून ते खऱ्या अर्थाने सहकाराच्या छत्राखाली वावरत आहेत आणि जगत आहेत. सहकार क्षेत्राने गेल्या शंभर वर्षांत विविध धर्म, पंथ, रूढी, चालीरीती, भाषा व संस्कृती असणाऱ्या गरीब आणि श्रीमंत वर्गातील लोकांना एकत्र कसे वागावे आणि जगावे हे शिकविले आहे. त्यातून नवीन समाजाची निर्मिती होत आहे, हे सहकार लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण होय. या प्रकरणात आपण सहकार संज्ञेचा अर्थ, व्याख्या आणि सहकाराची तत्त्वे अभ्यासणार आहोत.

सहकार संज्ञेचा अर्थ

(Meaning of Co-operation)

सहकार (Co-operation) हा शब्द मूळ लॅटिन को-ऑपररी (Co-operari) या शब्दापासून आलेला असून, को याचा अर्थ सह आणि ऑपररी (Operari) याचा अर्थ काम करणे; असा आहे. दोन्ही शब्दांचा एकत्रितपणे विचार केल्यास एकत्रितपणे काम करणे अथवा सहकार्याने काम करणे असा त्याचा अर्थ होतो. **सहकार या संज्ञेचा शब्दश: अर्थ परस्पर साहाय्य करणे किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे असा होतो.** सहकार ही कल्पना मानवाच्या इतिहासा इतकी जुनी आहे.

सहकार व्याख्या

(Definition of Co-operation)

१. सी. आर. फे यांच्या व्याख्येनुसार, समाजातील दुर्बल घटकांनी निःस्वार्थी भूमिकेतून संयुक्तपणे व्यवहार करण्यासाठी आणि जिचे व्यवहार सभासद, सभासदत्वाची कर्तव्ये पेलण्यास तयार आहेत आणि सभासद ज्या प्रमाणात व्यवहार करतात त्या प्रमाणात त्यांना संस्थेतील लाभांश उपलब्ध होईल या अटींवर चालतात, त्या संघटनेस सहकारी संघटना म्हणतात.

(A Co-operative Society, as in association for the purpose of joint trading, originating among the weak and conducted always in an unselfish spirit on such terms that all who are prepared to assume the duties of membership may share in its rewards in proportion to the degree in which they make use of the association.)

२. सर होरेस प्लंकेट यांच्या व्याख्येनुसार, संघटनेद्वारे परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकार होय. त्यांनी सहकाराचे सिद्धांत आणि व्यवहार तीन तत्त्वांत मांडले आहेत. उत्तम शेती, उत्तम व्यवहार आणि उत्तम राहणीमान.

३. पी. एच. कॅसलमन यांच्या व्याख्येनुसार, सामाजिक आशय असणारी आर्थिक पद्धती म्हणजे सहकार होय.

४. एच. कॅलव्हर्ट यांच्या व्याख्येनुसार, आर्थिक हितसंबंधांच्या उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी एकत्र येऊन निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय.

५. को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीने केलेली व्याख्या : स्वतःच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.

६. भारतीय सहकार कायदा, १९१२ नुसार, सहकार या तत्त्वानुसार सभासदांचे आर्थिक हित व उन्नती या हेतूने निर्माण झालेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.

७. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना-परिषद (१९९५) यांनी आपल्या सहकाराच्या व्याख्येत 'आपल्या आर्थिक आणि सामाजिक गरजांच्या तसेच आकांक्षांच्या पूर्ततेसाठी सर्वांनी स्वेच्छेने एकत्र येऊन सामाजिक मालकी असलेली व लोकशाही पद्धतीने नियंत्रित करता येईल अशा पद्धतीने स्थापन केलेली स्वायत्त संघटना म्हणजे सहकारी संस्था होय असे म्हटले आहे.

सहकाराची वैशिष्ट्ये

(Features of Co-operation)

१. सहकार हे व्यक्तींचे संघटन :

सहकार ही समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या गरजा सामूहिकपणे भागविण्यासाठी निर्माण केलेली संघटना होय. सहकार हा व्यक्तींनी संयुक्तपणे चालविलेला उपक्रम होय की, ज्यामध्ये भांडवलापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते. सहकारात एकत्र येणाऱ्या व्यक्ती समान उद्देशाने एकत्र येत असतात. त्यामुळे संघटित होताना व्यक्तीचे विचार आणि उद्देश समान असावे लागतात.

२. आर्थिक व्यवहार - सहकारी संघटना ही व्यवसाय क्षेत्रात आढळणाऱ्या इतर संघटनांप्रमाणे फक्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन होत नाही, कल्याणकारी किंवा धर्मादाय संस्थांप्रमाणेच तिचे स्वरूप असत नाही. ती सभासदांची आर्थिक पिळवणूक कमी करून त्यांच्या आर्थिक हितसंबंधांचे रक्षण व संवर्धन करावे या हेतूने निर्माण केलेली आणि लोकशाहीच्या तत्त्वानुसार सभासदांकडून नियंत्रित केली जाणारी एक संघटना होय.

३. विकासाचा मार्ग - सहकार हा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचा मार्ग आहे. त्यामुळे सहकारात व्यक्ती एकत्र येत असताना आर्थिक उन्नती, सामाजिक प्रतिष्ठा मिळविणे, शैक्षणिक विकास साधणे तसेच सांस्कृतिक जीवन विकसित करणे या उद्देशाने एकत्र येतात.

४. ऐच्छिक संघटना - सहकार ही एक ऐच्छिक संघटना होय. सहकार हा व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असावा. सहकारात सक्ती अथवा जबरदस्तीला स्थान नसते. सहकारात व्यक्ती भांडवल पुरवठा करणारी म्हणून सामील होत नाही, तर आर्थिक गरजा सारख्या आहेत म्हणून सामील होते. स्वेच्छेने सहकारात सामील झाल्यानेच प्रगतीचा मार्ग खुला होतो.

५. लोकशाही संघटना - सहकारी संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते आणि संस्थेचा कारभारही लोकशाही पद्धतीनुसार चालविला जातो. लोकशाही हा सहकाराचा गाभा आहे. सहकारात प्रत्येक व्यक्तीला एकच मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्याने संस्थेचे कितीही भाग विकत घेतले असले तरी त्याला महत्त्व दिले जात नाही.

६. सेवाभाव - समाजातील दुर्बल व्यक्तींना कमी किमतीत वस्तू आणि सेवांचा पुरवठा करणे हा सहकारी संस्थांचा प्रधान हेतू असतो. समाजातील गरीब वर्गाला जीवनावश्यक माल माफक दरात देऊन त्यांच्या आर्थिक विकासास मदत करणे हा सहकार सेवाभावाचा आत्मा होय. त्यामुळे सहकारी संस्थांचे कार्य सेवाभावावर अधिक दृष्टी ठेवून चालविले जाते.

७. आधिक्यात सहभाग: सहकारी संस्थेवर सभासदांचे नियंत्रण असते आणि सर्व जण संस्थेच्या कार्यात भाग घेतात. संस्थेवर व्यवसायाद्वारे मिळणारे आधिक्य किंवा नफा हा सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात परत केला जातो.

८. समानतेची वागणूक : सहकारी संस्थेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस समानतेची वागणूक मिळते. समानतेचा दृष्टिकोण ठेवून सर्वांना सारखे मानले जाते. त्यामुळे जात, धर्म, पंथ, सामाजिक दर्जा किंवा प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती इत्यादींचा विचार केला जात नाही. त्यातून सहकार्य वाढून संस्थेबाबत प्रगतीचा दृष्टिकोण निर्माण होतो.

९. सहकार ही एक आर्थिक व सामाजिक चळवळ : सहकारी संस्थांची वरील सर्व लक्षणे लक्षात घेतली तर सभासदांसाठी वस्तू आणि सेवांचे व्यवहार करणारी संघटना एवढे तिचे स्वरूप राहत नाही. तिच्याकडे शांततापूर्ण मार्गाने आर्थिक आणि सामाजिक बदल घडवून आणण्याचे एक उत्कृष्ट साधन म्हणून पाहिले जाते.

१०. सामाजिक जबाबदारी : सहकारी संघटना ही एक सामाजिक जबाबदारी किंवा समाजाबद्दलची कर्तव्ये मानणारी संघटना आहे. त्यामुळे सामाजिक उद्देश डोळयांसमोर ठेवून संघटनात्मक व्यवहारात सभासदांचा सहभाग वाढवून त्यांना त्याचे लाभ देणे आणि सभासदांचा म्हणजेच समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास साधणे हे सहकाराचे ब्रीद होय. सहकार सभासदांचे जीवन समृद्ध करण्यासाठी कार्य करते.

११. उद्देशावरील निष्ठा आणि चारित्र्य हा आधार : सहकारात व्यक्तींचे लोकशाही संघटन विशिष्ट उद्देशाने होत असताना, सभासदांची उद्देश आणि त्यासाठी सहकार्य यावर निष्ठा असावी. उद्देशासाठी कार्य करीत असताना सभासदांनी चारित्र्य आणि बंधुत्व जोपासावे. तसेच अनिष्ट प्रवृत्तीपासून संस्था दूर ठेवावी.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना

(International Co-operative Alliance)

जिनिव्हा, स्वित्झर्लंड इथे सन १८९५ मध्ये स्थापन झालेली ही एक बिगर शासकीय संघटना आहे. जगभरात विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांसाठी शीर्ष अथवा शिखर संस्था म्हणून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना कार्य करते. सद्य:स्थितीत जगभरातील १०९ देशांतील सहकारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या ३१२ सहकारी संघटना या संस्थेच्या सदस्य आहेत.

जगभरातील सहकारी चळवळींना प्रोत्साहन देणे, सहकारी मूल्ये व तत्त्वांची जोपासना करणे, सदस्य संस्थांना उपयुक्त मार्गदर्शन करणे व त्यांच्यात परस्पर फायदेशीर हितसंबंध निर्माण करण्यास मदत करणे, तसेच सहकाराच्या माध्यमातून मानवाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी मदत करणे अशा मूलभूत उद्देशांना अनुसरून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना कार्य करते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना व सहकाराची तत्त्वे

(ICA Principles)

सहकारी तत्त्वावर कार्य करणाऱ्या संस्थांचा जगभरातील विविध देशांत, विविध क्षेत्रांत वेगाने प्रसार होत असताना काळानुरूप त्यांच्या कार्यात व आकारातही बदल होत होता. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सदर बदलांचा विचार करून सहकारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शक सहकारी तत्त्वांचीही काळानुरूप मांडणी करण्यासाठी वेळोवेळी समित्या स्थापन करून सहकारी तत्त्वांच्या पुनर्मांडणीचे कार्य पार पाडले आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने अशा प्रकारे समित्या स्थापून त्यांच्या शिफारशीनुसार सन १९३७, १९६७ आणि १९९५ मध्ये निर्देशित केलेल्या सहकाराच्या तत्त्वांचा आता आपण विचार करणार आहोत.

१. सहकारी संघटनेद्वारा निर्देशित सहकाराची तत्त्वे सन १९३७

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या १९३० मध्ये व्हिएतनाम येथे भरलेल्या सभेत रॉशडेलच्या सहकार तत्त्वांचा वापर सभासद राष्ट्रांमधील सहकारी संस्थांतून कितपत केला जातो याचा अभ्यास करून त्या तत्त्वांची यादी सादर करण्यासाठी विशिष्ट समिती नेमण्याविषयी केंद्रीय समितीला सांगण्यात आले. अशी समिती लंडन येथील कॉंग्रेसमध्ये नेमण्यात आली आणि तिने आपला अहवाल १९३७ मध्ये सादर केला. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या समितीने आपल्या अहवालात रॉशडेलची पुढील सात सहकार तत्त्वे, आवश्यक तत्त्वे असल्याचे नमूद केले. (१) खुले सभासदत्व (२) लोकशाही नियंत्रण (३) सभासदांनी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात आधिक्याचे वाटप (४) भांडवलावर मर्यादित व्याज (५) राजकीय आणि धार्मिक तटस्थता (६) रोखीचे व्यवहार आणि (७) शिक्षणाचा प्रसार इत्यादी.

२. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेद्वारा निर्देशित सहकाराची तत्त्वे सन १९६७

१९६६ च्या आंतरराष्ट्रीय सहकार संघटन कॉँग्रेसने हा अहवाल स्वीकारून जगातील सहकारी चळवळीला सहा तत्त्वांची शिफारस केली. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१. सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले व ऐच्छिक असावे.

२. सहकारी संस्थेचे कार्य लोकशाही व्यवस्थापनाप्रमाणे चालावे.

३. भांडवलावर मर्यादित व्याज द्यावे.

४. सहकारी संस्थेला होणाऱ्या आधिक्याचे वाटप सभासदांमध्ये त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारानुसार करण्यात यावे.

५. सभासदांना सहकाराचे शिक्षण द्यावे, आणि

६. सहकारांतर्गत सहकार असावा.

३. आधिक्याचे वाटप (Distribution of Surplus) :

सहकारी संस्थांनी वर्षभरात किंवा विशिष्ट कालावधीत सभासदांशी केलेल्या व्यवहारामुळे मिळणारे आधिक्य सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात वाटले जाते, त्यांनी संस्थेच्या धारण केलेल्या भागभांडवलाच्या प्रमाणात नाही. या तत्त्वामुळे एक प्रकारे सभासदांच्या सहकारनिष्ठेत वाढ होऊन सभासद आणि संस्था यांच्यातील संबंध दृढ होण्यास मदत होते. चार्लस गिद (Charles Gide) यांच्या मते, सभासदांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात आधिक्याचे वाटप करण्याचे हे तत्त्व नावीन्यपूर्ण, क्रांतिकारक होय. कॅलव्हर्ट यांच्या मते, सहकारी संस्थांचे व्यवहारातील आधिक्य म्हणजे अधिक किंमत आकारणी होय आणि ती ज्यांच्याकडून मिळते, त्यांनाच ती परत केली पाहिजे. सहकारी संस्था हे ऐच्छिक संघटन होय आणि ती सभासदांना सेवा देण्यासाठी निर्माण झालेली असते.

४. भांडवलावर मर्यादित व्याज (Limited Interest on Capital) :

भांडवलावर मर्यादित व्याज हे सहकारी संस्थेचे आणखी एक महत्त्वाचे तत्त्व होय. भांडवलावर नियंत्रण न ठेवल्यास विषमता निर्माण होण्याची शक्यता असल्याने सहकारात भांडवल या घटकाला गौण स्थान दिले जाते. सहकार चळवळ प्रणेत्यांनी भांडवलावर व्याज दिले जाऊ नये असे स्पष्ट मत मांडले, पण व्याज दिल्याशिवाय आवश्यक तेवढ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होणार नाही हे त्यांना कळून आले. लॅबर्ट यांच्या मताप्रमाणे, सहकारी संस्था प्रामाणिकपणाच्या दृष्टिकोणातून भांडवलावर व्याज देत नाहीत किंवा बचत वाढविण्यासाठीही व्याज दिले जात नाही, तर फक्त आवश्यकतेपोटीच व्याज दिले जाते.

५. सहकार प्रशिक्षण (Co-operative Education) :

सहकारी चळवळीतील सभासद हे सुजाण आणि शिक्षित असावेत आणि सहकारी तत्वाचे योग्य प्रकारे प्रशिक्षण दिलेल्या व्यक्तींच्या हातातच सहकारी संस्थेचा कारभार असावा याबद्दल सहकार तज्ज्ञांत एकमत होते. भारतात १९१५ साली नेमलेल्या समितीनेदेखील सहकारी संस्थेच्या सभासदांना शिक्षण देण्याचे महत्त्व विशद केले. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकार तत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष प्रा. डी. जी. कर्वे यांनी सहकारी चळवळीच्या अस्तित्वासाठी सहकारी शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे फायद्याचे नसल्याचे स्पष्ट केले. सर्व नागरिकांना सहकाराचा अर्थ व फायदे, सभासदांना सहकार व सहकार पद्धती आणि सहकारी संस्थेच्या अधिकारी व नोकरवर्गास त्यांच्या कार्याविषयीचे प्रशिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे असते. या कार्यासाठी सहकारी संस्थांनी आपल्या अंदाजपत्रकात आवश्यक त्या निधीची तरतूद करावी आणि सहकार प्रशिक्षणात सहभागी व्हावे.

६. सहकारांतर्गत सहकार (Co-operation among Co-operators) :

आधुनिक स्पर्धात्मक जगात सहकारी संस्थांनी एकमेकांत सहकाराचे धोरण आरंभल्याशिवाय त्यांना अपेक्षेप्रमाणे सभासदांची आणि सहकारी क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या गरजवंत समाजाची सेवा करता येणार नाही, याची जाणीव सहकारी संस्थांना होऊ लागली आहे. सहकारी चळवळ हा एक घटक मानून तिची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे ही सहकारांतर्गत सहकार तत्त्वामागील धारणा आहे.

डॉ. ए. एफ. लॉडलॉ यांनी सहकारांतर्गत सहकार तत्त्वाला सहकार क्षेत्र निर्माण करण्याचे तत्त्व असे म्हटले आहे. मिस. एम. डिग्बे यांच्या मते, आधुनिक आर्थिक जगतात सहकाराचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी किंवा त्याचा विकास होण्यासाठी सहकारी संस्थांनी एकमेकांस सहकार्य करण्याची शक्यता अजमावली पाहिजे आणि एकमेकांस सहकार्य करण्याचे धोरण आरंभिले पाहिजे.

७. रोखीचे व्यवहार (Cash Trading) :

रॉशडेल प्रणेत्यांनी ग्राहक चळवळीच्या संदर्भात या तत्त्वाचा विचार केला, तसेच त्या काळात सहकारी संस्थांकडील भांडवल अपुरे असल्याने आर्थिक सामर्थ्य टिकविण्यासाठी रोखीचे व्यवहार करण्याच्या तत्त्वाला महत्त्व दिले गेले. सहकारी संस्थेच्या सभासदांना त्यांच्याजवळ असणाऱ्या मर्यादित उत्पन्नात काटकसरीने राहिल्यास खर्च कमी होऊन किमतीही कमी होतात आणि सहकारी संस्थांचे व्यवहार सुरक्षित होऊन कमी अनुभव असणाऱ्या संचालकांना संस्थेचे कार्य करणे सुलभ जाते इत्यादी फायदे लक्षात घेऊनच त्यांनी रोखीच्या व्यवहाराची शिफारस केली.

८. राजकीय आणि धार्मिक तटस्थता

(Political & Religious Neutrality) :

सहकारी संस्था ही एक आर्थिक संघटना असून ती राजकीय आणि धार्मिक विचारांची संघटना नव्हे, असा राजकीय आणि धार्मिक तटस्थता या तत्त्वाचा अर्थ आहे. सहकारी संस्था या मुख्यत्वेकरून सभासदांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने अस्तित्वात येत असतात. म्हणजेच राजकीय किंवा धार्मिक दृष्टीतून सभासदांची सेवा करण्याकरिता त्या अस्तित्वात येत नाहीत. म्हणून सहकारी संस्थांतून सभासदांना धार्मिक अगर राजकीय दृष्टिकोणातून प्रवेश दिला जाऊ नये अथवा सभासदांवर दडपण आणले जाऊ नये. तसेच संघटनेतील प्रत्येक सभासदास त्याची निष्ठा असणाऱ्या दुसऱ्या राजकीय अथवा धार्मिक संघटनेबद्दल विचार मांडण्यास किंवा कार्य करण्यास स्वातंत्र्य द्यावे. सहकारी संस्थांनीदेखील आपल्या स्वातंत्र्याच्या बदल्यात कोणत्याही राजकीय अथवा धार्मिक हेतूने आपले कार्य करू नये.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेद्वारा निर्देशित सहकाराची तत्त्वे सन १९९५ (मँचेस्टर तत्त्वे) (Manchester Principles)

१९९५ मध्ये मँचेस्टर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या सभेत बदलत्या जागतिक परिस्थितीच्या संदर्भात सहकारी तत्त्वांचा पुनर्विचार करण्यात आला. उपलब्ध जागतिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून सहकारी तत्त्वाची पुनर्मांडणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक शिफारशी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने स्वीडनमधील स्वेन अके बुक यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती नेमली होती. या समितीने केलेल्या शिफारशीचा १९९२ मध्ये जपानमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या सभेत विचार करण्यात आला. १९९५ मध्ये इंग्लंडमध्ये मँचेस्टर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेत सहकारी तत्त्वांवर सखोल विचारविनिमय होऊन सहकाराची पूर्वीची काही तत्त्वे आहेत, तशीच ठेवण्यात आली आणि काही तत्त्वांची शब्दरचना बदलण्यात आली. तसेच काही तत्त्वे नव्याने समाविष्ट करण्यात आली.

मँचेस्टर परिषदेने सुचविलेली आणि सर्व राष्ट्रांनी मान्यता दिलेली सहकाराची सात तत्त्वे पुढीलप्रमाणे

१. ऐच्छिक आणि खुले सभासदत्व (Voluntary and Open Membership)

२. सभासदांचे लोकशाही नियंत्रण (Members Democratic Contral)

३. सभासदांचा आर्थिक सहभाग (Members Economic Participation)

४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य (Autonomy and Independence)

५. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती (Education, Training and Information)

६. सहकारांतर्गत सहकार (Co-operation among Co-operative)

७. समाजाबद्दलचे कर्तव्य (Concern for Community)

१. ऐच्छिक व खुले सभासदत्व

सहकारी संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा संस्थेच्या कार्याचा लाभ घेऊ शकणाऱ्या सर्वांना सहकारी संस्थेचे सभासदत्व ऐच्छिक व खुले असावे असे सांगणारे हे तत्त्व होय. यातील ऐच्छिक म्हणजे कोणत्याही व्यक्तीवर संस्थेच्या सभासदत्वासाठी दडपण आणले जाऊ नये आणि खुले सभासदत्व म्हणजे राजकीय, धार्मिक, वांशिक, जातीय अगर भाषा व प्रांत या सबबींवर कोणताही भेद न करता सभासदत्व दिले जावे. सभासदत्व स्वीकारणारी व्यक्ती ही सभासदत्वाला जोडलेली कर्तव्ये पार पाडण्यास तत्पर असली पाहिजे.

२. संस्थेवरील लोकशाही नियंत्रण

रॉशडेल प्रणेत्यांनी मांडलेले हे मूलभूत तत्त्व होय. १९३७ साली आणि १९९६ साली घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेतही या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला होता. १९९५ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या सभेतही या तत्त्वाचा पुन्हा पुरस्कार करण्यात आला. या सहकारी संस्थेने सभासद झालेल्या स्त्री अथवा पुरुषास एक सभासद एक मत या न्यायाने संस्थेच्या संचालक मंडळावर निवडून येता येते आणि सभासदांचे प्रतिनिधित्व करता येते. तसेच संस्थेच्या नित्याच्या व्यवस्थापनात भाग घेता येतो.

३. सभासदांचा आर्थिक सहभाग:

या तत्त्वाची मांडणी नव्या स्वरूपात करण्यात आली आहे. रॉशडेल संस्थापकांनी आपल्या तत्त्वांची मांडणी करताना; भांडवलावर नियंत्रित दराने व्याज, या अर्थाने स्वीकारलेले तत्त्व किंवा १९३७ आणि १९६६ सालच्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या परिषदेने मांडलेले;भांडवलावर मर्यादित व्याज; हे तत्त्व स्वीकारले होते. सहकारी संस्थेत समान स्वरूपात भाग रूपाने भांडवल गुंतविणाऱ्या सभासदांना मर्यादित प्रमाणात लाभांश दिला जावा असे या तत्त्वात अपेक्षित असून त्यास सभासदांच्या आर्थिक सहभागाबद्दल मर्यादित प्रमाणात लाभांश असे म्हणणे योग्य ठरते. सभासदांना नफ्यातून मर्यादित दराने लाभांश दिल्यानंतर शिल्लक नफ्याचा वापर दरवर्षीप्रमाणे आवश्यक निधी व तरतुदी करण्यासाठी केला जावा.

४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :

या तत्त्वाचा नव्याने अंतर्भाव करण्यात आला आहे. सहकारी संस्था या स्वायत्त संस्था आहेत. त्यामुळे संस्थेबाहेरील घटकांकडून कोणत्याही स्वरूपात भांडवल स्वीकारताना अगर त्यासाठी करार करताना संस्थेच्या स्वायत्ततेस कोणताही धोका पोहोचता कामा नये किंवा संस्थेची स्वायत्तता लक्षात घेऊनच बाहेरील घटकांनी भांडवलाचा पुरवठा करावा. या तत्त्वाद्वारे एक प्रकारे संस्थांना बाहेरील घटकांकडून किंवा खाजगी लोकांकडून संस्थेसाठी भांडवल स्वीकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत आणि जागतिकीकरणाच्या कल्पनेत सहकारी संस्थांना आपल्या कारभाराची व्याप्ती वाढविता यावी या दृष्टीने हे तत्त्व उपयुक्त मानावे लागेल.

५. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती :

सहकारी संस्थेच्या सभासदांना शिक्षण; द्यावे हे मूलभूत तत्त्व म्हणून रॉशडेल संस्थापकांनी स्वीकारले होते. १९३७ आणि १९६६ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेतही या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला. १९९५ सालच्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने हे तत्त्व नव्याने स्वीकारताना त्यात शिक्षणाबरोबर प्रशिक्षण आणि माहिती या शब्दांचा समावेश केला. त्यामागे सभासदांप्रमाणे सहकारी संस्था सभासदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी म्हणजे संचालक मंडळ किंवा कार्यकारी मंडळ, तसेच व्यवस्थापक आणि सेवक या सर्वांनाच सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याविषयीची गरज प्रतिपादित केली आहे..

६. सहकारांतर्गत सहकार :

१९६६ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेने या तत्त्वांचा नव्याने अंतर्भाव केला होता. त्याचाच पुनरुच्चार १९९५ सालच्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या परिषदेने केला. या तत्त्वाद्वारे सहकारी संस्थांनी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अन्य सहकारी संस्थांशी सहकार्य करून आपले बळ वाढविले पाहिजे असे अपेक्षित आहे. सहकारांतर्गत सहकारामुळे सहकारी संस्थांच्या कार्यांना प्रसिद्धी मिळून त्यांच्या विकासास मदत होते.

७. समाजाबद्दलचे कर्तव्य :

१९९५ सालच्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने ;समाजाबद्दलचे कर्तव्य; हे नवीन सहकाराचे तत्त्व म्हणून स्वीकारले आहे, या तत्त्वाद्वारे सहकारी संस्थांनी समाजाभिमुख बनण्याची गरज प्रतिपादित केली आहे. म्हणजे सहकारी संस्थांनी फक्त सभासदांच्या हिताचा विचार न करता संपूर्ण समाजाबद्दलच्या कर्तव्याबद्दल जागृत राहिले पाहिजे असे हे तत्त्व सांगते.

सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका

(Role of Co-operation in Economic Development)

सहकारात व्यक्ती स्वत:जवळील तुटपुंजी उत्पादन साधने आणि बचती एकत्र आणून परस्पर साहाय्याने स्वतःचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करतात. अर्थात, देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहकाराचा कार्यभाग कितपत असावा हे सरकारच्या आर्थिक धोरणावर आणि सहकारी संस्थांच्या विकास कार्यक्रमातील महत्त्वावर अवलंबून असते. सरकार आर्थिक धोरणाची दिशा निश्चित करून देशाचा आर्थिक, औद्योगिक, कृषी व इतर क्षेत्रांचा विकास करू शकते. सरकार हा प्रयत्न आपल्या परीने करीत असते. त्यात देशातील नागरिक सहभागी होतातच असे नाही. पण सहकारात समाजातील दुर्बल घटक स्वत:जवळील मर्यादित साधनसामग्रीच्या आधारे परस्पर साहाय्याने स्वतःचे आर्थिक प्रश्न सोडविण्याचा आणि आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करतात. यातील परस्पर साहाय्याने स्वतःचा आर्थिक विकास करणे ही सहकारातील मूलभूत प्रेरणा आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली पाहिजे.

सहकाराची आर्थिक विकासातील भूमिका

१. कृषी विकास :

विकसनशील देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा पन्नास टक्क्याहून अधिक असतो. भारत आणि अन्य विकसनशील देशांत सहकारी क्षेत्रात कृषी उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करावा लागतो आणि त्याबरोबर शेतकरी वर्गाची सावकारांच्या पाशातून मुक्तता करणे, शेतीसाठी अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे, शेतीसाठी अवजारे, सुधारित बी-बियाणे, जंतुनाशके आणि खतांचा पुरवठा करण्याचे कार्य करावे लागते. बदलत्या जागतिक परिस्थितीत सहकारी संस्थांना विशेष लक्ष द्यावे लागते. कृषी उत्पन्न वाढ, खर्च कमी करणे आणि सभासदांच्या उत्पादनांना अधिक भाव मिळवून देणे या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागत आहे.

२. कृषी संशोधन :

कृषी क्षेत्र विकासात सहकारी क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. त्यात कृषी संशोधनाचे कार्य अत्यंत आवश्यक ठरते. सहकारी संस्थांना फक्त उत्पादनवाढीचा विचार न करता, धान्यांच्या नवीन जाती शोधणे, कृषी महाविद्यालयाच्या मदतीने संशोधित बी-बियाणांचे उत्पादन करणे, फळांच्या सुधारित जाती विकसित करणे, ऊस संशोधन, खतांचा वापर, पाणीपुरवठा व्यवस्थापन, पीक संरक्षण इत्यादींचा विचार करावा लागतो. साखर कारखाना क्षेत्रातून शेती परिषदा घेऊन शेतकऱ्यांचे पायलट स्कीम राबविण्यात सहकार्य मिळविणे, उसाच्या नवीन जाती तयार करणे, पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे, पिकांवरील रोग नियंत्रण तसेच पिकांवर हवामानातील बदलाचा होणारा परिणाम आणि घ्यावयाची काळजी यांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे या कार्यात सहकारी क्षेत्राची कामगिरी विशेष मोलाची ठरते.

३. औद्योगिक विकासास चालना :

सहकाराच्या छत्राखाली कृषी उत्पादकांना एकत्र आणून सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्था, सहकारी खत कारखाने, तेल गिरण्या, भात गिरण्या, फळ प्रक्रिया संस्था, तागाच्या गिरण्या इत्यादी उद्योगांचा सहकारी तत्त्वावर विकास करता येतो. अशा उद्योगांना लागणारा कच्चा माल ग्रामीण भागातच उपलब्ध असतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी येतो आणि कृषी उत्पादकांच्या शेतमालास चांगली किंमत देता येते. तसेच अशा उद्योगांतून निर्माण झालेल्या उत्पादनास ग्रामीण भागातच ग्राहक मिळू शकतात. सहकारी क्षेत्रात वरील उद्योगांचा विकास करता येतो आणि अशा उद्योगांच्या प्रक्रियेतून राहणाऱ्या शिल्लक मालावर आधारित कागद कारखाने, प्लायवूड निर्मिती, स्पिरीट व अन्य उत्पादने, खत कारखाने इत्यादी चालविता येतात. अशा प्रकारे ग्रामीण भागाचा कायापालट करण्यात सहकारी क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते.

४. लघु उद्योगांचा विकास

सहकारी क्षेत्र ग्रामीण भागातील कारागीर, हस्तशिल्पी, रेशीम विणकर, खादी उत्पादन, कागदनिर्मिती, वृक्षसंवर्धन, फलोद्यान, परंपरागत ऊर्जा वापर, अखाद्य तेलनिर्मिती, साबणनिर्मिती, कुंभार शिल्प, पापड मसालानिर्मिती, औषधी वनस्पतीनिर्मिती, ताडगूळनिर्मिती, डिंक व लाख गोळा करणे इत्यादी उद्योगांच्या विकासासाठी अल्प व्याजदरात कर्जे देणे, कारागिरांना प्रशिक्षण सोय, उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देणे इत्यादी बाबतीत सहकारी क्षेत्राची भूमिका विशेष महत्त्वाची आहे. त्यामुळे अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींच्या उत्पन्नवाढीस मदत करणे, स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणे, जातिजमातीत सलोखा वाढविणे व आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी सहज शक्य होतात. भारतात या कार्यात सहकारी क्षेत्राने पुढे यावे म्हणून नाबार्ड, स्टेट बँक ऑफ इंडिया, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ इत्यादी संस्था विशेष प्रयत्नशील आहेत.

५. उत्पन्नात वाढ

कृषी उत्पादनाशी संबंधित प्रक्रिया उद्योगांची स्थापना केल्याने कृषी मालास अधिक भाव मिळतो. तसेच लघु उद्योग, कुटीरोद्योग आणि अन्य ग्रामीण उद्योगांना अर्थसाहाय्य करणे, कारागिरांना प्रशिक्षण देणे, आधुनिक तंत्राचा वापर शिकविणे, बाजारपेठ मिळवून देणे इत्यादींमुळे उद्योजकांचे उत्पन्नाचे प्रमाण वाढते. ग्रामीण आणि नागरी भागात स्थापन होणारे उद्योग आपल्या क्षेत्राच्या परिसरात लहान-मोठ्या उद्योगांच्या व व्यवसायाच्या विकासास मदत करतात. त्यामुळे उत्पन्नात भर पडण्यास मदत होते. अशा प्रकारे नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात भर टाकणे व राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे या दोन्ही गोष्टींद्वारे सहकारी संस्था देशातील नागरिकांचे राहणीमान उंचाविण्यास मदत करीत असतात.

६. बचतींना प्रोत्साहन :

वाढीव उत्पन्नामुळे बचतीत वाढ होते. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, दुग्ध उत्पादन संस्था, फळ प्रक्रिया संस्था व अन्य उद्योग सुरुवातीस ग्रामीण जनतेकडून भांडवल गोळा करून त्यांना बचत करावयास लावतात. त्यानंतर परतीच्या ठेवी, बिन परतीच्या ठेवी, स्वेच्छा ठेवी, अल्प मुदत ठेवी घेत असतात. ग्रामीण भागात स्थापन झालेल्या सहकारी बँका, पतसंस्था, भिशी मंडळेदेखील ग्रामीण जनतेला ठेवीसाठी प्रोत्साहन देत असतात आणि बचत करावयास लावतात. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात गोळा होणारा निधी पुन्हा कृषी आणि कृषीतर कार्यात गुंतविला जातो आणि त्यापासून पुन्हा जनतेच्या प्राप्तीच्या प्रमाणात वाढ होते.

७. दृष्टिकोणात बदल :

देशाच्या ग्रामीण भागात सहकारी क्षेत्र आणि त्याच्या मदतीने कृषी क्षेत्र आणि उद्योगांचा विकास होतो आणि त्याचा परिणाम ग्रामीण जनतेवर होतो. त्यांच्या कृषी व अन्य आर्थिक कार्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात बदल होतो. हा बदल फार महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून बाजारपेठेतील हालचाल, किमतीतील बदल, बाजारपेठेची मागणी आणि गुणवत्ता जपणूक इत्यादींबाबत ग्रामीण जनतेची जागरूकता वाढते. त्यातून आपल्या कृषी किंवा कृषिपूरक कार्याकडे व्यापारी दृष्टिकोणातून पाहण्याची वृत्ती निर्माण होते. परिणामतः उत्पादनात वाढ, दर्जात सुधारणा, उत्पादन खर्च कपात इत्यादी बाबींकडे अधिक लक्ष दिले जाते. दृष्टिकोणातील बदलामुळे उत्पन्नात स्थिरता येते तसेच निश्चिती लाभते. त्यातून सामाजिक दर्जा उंचावणे, राहणीमानात वाढ, शैक्षणिक विकासास महत्त्व देणे इत्यादीला महत्त्व दिले जाते.

८. सुविधांचा विकास

सहकाराच्या माध्यमातून कृषी उद्योग आणि लघु उद्योगाचा ग्रामीण क्षेत्रात विकास करण्यासाठी प्रथम मूलभूत सुविधांचा विकास करावा लागतो. ग्रामीण भागात पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुविधांचा विकास होण्यासाठी सरकार आर्थिक मदत आणि प्रोत्साहन देते. कृषी पंपांना विजेचा पुरवठा करणे व त्यातून शेतीसाठी पाणीपुरवठ्याची सोय करणे, ग्रामीण भागात खेड्यांना जोडणारे असे रस्ते बांधणे की, ज्यामुळे कृषी उत्पादने कारखान्यांना किंवा बाजारपेठांना पाठविता येतील. सहकारी संस्था सरकारी मदत जनतेपर्यंत पोहोचवितात. त्यामुळे भाजीपाला, दूध, फळे आणि अन्य नाशवंत मालास योग्य किंमत मिळू शकते.

९. महिला वर्गाचे कल्याण :

महिला वर्ग आणि महिला कल्याण हा ग्रामीण भागातील दुर्लक्षित विषय आहे. परंतु सहकारी क्षेत्राद्वारे कृषी आणि औद्योगिक विकासाबरोबर महिला वर्गाचे प्रमाण अर्थव्यवस्थेतील योगदान वाढवून त्यांच्या कल्याणाकडे लक्ष दिले जाते. ग्रामीण भागात महिलांकडून चालविल्या जाणाऱ्या दूध संस्थांचा विकास करणे, सहकारी तत्त्वावर पापड, लोणची, होजिअरी, वूलन कपडे, ड्रेस मटेरियल, शाळेचे युनिफॉर्मस् इत्यादी तयार करणे तसेच सहकारी दुग्ध संस्थांतून दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणे व त्यांची बांधणी करणे इत्यादी कामे महिला सहकारी संस्थांकडून केली जातात. तेथे ग्रामीण भागातील महिलांना अर्धवेळ रोजगार दिला जातो.

१०. रोजगारात वाढ

भारतात सर्व सहकारी साखर कारखान्यात प्रत्येकी एक हजारपेक्षा अधिक लोकांना कायमचा रोजगार मिळालेला असून हंगामाच्या काळात भूमिहीन मजूर आणि गरीब शेतकऱ्यांना तात्पुरता रोजगार उपलब्ध झाला आहे. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, तेल व डाळीच्या गिरण्या यांनी कायमचा रोजगार उपलब्ध करून देण्याशिवाय स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण केल्या आहेत. लघु उद्योगांच्या विकासासाठी सहकारी क्षेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या प्रयत्नामुळे ग्रामीण भागात हस्तशिल्पी कारागीर, लघु व्यावसायिक, स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती, कलाकुसर करणाऱ्या व्यक्ती इत्यादींना कायमचे व्यवसाय मिळाले आहेत.

११. निर्यात व्यापारात सहभाग :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहकारी संस्थांनी विदेशी व्यापारात मोठ्या प्रमाणात भाग घेण्यास सुरुवात केली असून सहकारी संस्थांमार्फत कृषी उत्पादने, दुग्ध उत्पादने, प्रक्रिया केलेला माल, साखर, भाजीपाला, फळे आणि जंगल उत्पादने या मालाच्या निर्यातीद्वारे देशाला विदेशी चलन मिळवून देत आहेत. देशाच्या आर्थिक विकासात सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. एकविसाव्या शतकाने नवीन आव्हाने निर्माण केली असून निर्यातीची लक्ष्ये डोळ्यांसमोर ठेवून उत्पादने घ्यावी लागत आहेत. साखर, कापूस, फळे, वनौषधी आणि दूध उत्पादने इत्यादींना अधिक भाव मिळावा म्हणून प्रयत्न महत्त्वाचे ठरत आहेत.

सहकार विकासासाठी स्थापित समितींचा (कार्याचा) आढावा

(Review of Committees on Co-operative Development Since 1991)

प्रास्ताविक :

भारतात १९९० नंतर सरकारने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाचे दूरगामी परिणाम अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर दिसू लागले. सहकारी क्षेत्रही यापासून अलिप्त नसल्याने सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी सदर क्षेत्राच्या आतापर्यंतच्या कार्याचे सिंहावलोकन करून सहकारी चळवळीतील उणिवा, दोष, त्रुटी दूर करणे तसेच चळवळ सुदृढ करणे आणि त्यासाठी काही मर्यादा व कायदेशीर बंधने घालणे आवश्यक ठरले. सहकार क्षेत्राच्या निकोप विकासासाठी या क्षेत्राचा आढावा घेऊन त्यातील दोष दूर करण्यासाठी व सदर चळवळीला बळ देण्यासाठी प्रामुख्याने भारत सरकार व त्या अंतर्गत शीर्ष संस्थांनी सन १९९० नंतर वेळोवेळी स्थापन केलेल्या प्रमुख समित्यांच्या कार्याचा आढावा आपण सदर प्रकरणात घेणार आहोत.

१. पंत समिती (१९९०) :

अध्यक्ष : जे. सी. पंत (अतिरिक्त सचिव, कृषी वसहकार विभाग)

उद्देश : सहकारी पत वितरण प्रणालीच्या सक्षमीकरणासाठी कृषी पत पुनरावलोकन समिती (१९८९) च्या शिफारशींच्या अंमलबजावणीवर विचार करणे.

कार्य आढावा : समिती स्थापनेच्या उद्देशाला अनुसरून पंत समितीने सुचविलेल्या कृती योजनेत खालील उपाययोजनांचा समावेश होता.

१. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व बँकांमध्ये कार्य करणाऱ्या कर्मचारी वर्गाला व्यवसाय विकास योजनांच्या सर्व पैलू संदर्भात प्रशिक्षण देणे, ज्याचा उपयोग कर्ज वितरण व्यवसायातील वाढ, ठेव संकलनातील वाढ तसेच व्यवसायाची नफाक्षमता वाढविणाऱ्या कृतीमधील वाढ या स्वरूपात होईल.

२. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांच्या आर्थिक सक्षमतेसाठी निर्दिष्ट पाच वर्षांच्या योजनेच्या कालावधीमध्ये वाढ करून तो दहा वर्षे इतका करणे.

२. ब्रह्म प्रकाश समिती (१९९९) : अध्यक्ष चौधरी ब्रह्म प्रकाश उद्देश : सहकारी चळवळीचा आढावा घेणे, भविष्यकालीन दिशानिर्देश सुचविणे आणि आदर्श सहकारी कायद्याची निश्चिती करणे.

अहवाल सादरीकरण १९९१

संपूर्ण भारतात एक आदर्श सामायिक सहकारविषयक कायदा असावा या दृष्टिकोणातून चौधरी ब्रह्म प्रकाश यांच्या नेतृत्वाखाली ब्रह्म प्रकाश समिती नेमण्यात आली. सहकार क्षेत्राला स्वावलंबी, स्वायत्त बनविण्यासाठी तसेच सहकारी संस्थांच्या सदस्यांना जास्तीचे अधिकार बहाल करून सहकारी संस्थांच्या कार्यातील शासनाचा हस्तक्षेप कमी करणे यासाठी उपाययोजना सुचविणे हे समितीकडून अपेक्षित होते. समितीने आपल्या अहवालासोबतच एका आदर्श सहकारी कायद्याचा मसुदासुद्धा सादर केला. सदर आदर्श मसुदा हा भारतातील सर्व राज्य सरकारांकडे विचारार्थ प्रसारित करण्यात आला, मात्र अशा कायद्याच्या स्वीकृतीविषयक राज्य सरकारांकडून अत्यल्प प्रतिसाद प्राप्त झाला. केंद्र सरकारने सन २००२ मध्ये पारित केलेला बहुराज्य सहकारी संस्था कायदा हा ब्रह्म प्रकाश समितीने सादर केलेल्या मसुद्यावर आधारित आहे.

३. मिर्धा समिती (१९९६) : अध्यक्ष श्री. आर. एन. मिर्धा

उद्देश : सहकारी संस्थांची स्वायत्तता निश्चित करून, त्यांना लोकशाही मार्गाने आणि व्यावसायिकदृष्ट्या व्यवस्थापित संस्था म्हणून कार्य करण्यासाठी आवश्यक धोरण निर्मितीसाठी केंद्र सरकारला सल्ला देणे व मार्गदर्शन करणे..

कार्य आढावा : प्रामुख्याने बहुराज्यीय सहकारी संस्था कायद्यामध्ये करावयाचे बदल व दुरुस्ती संदर्भात उद्भवणाऱ्या मुद्द्यांचा विचार करून त्या संदर्भातील शिफारशी करण्याचे कार्य मिर्धा समितीने केले.

४. अलाघ समिती (१९९९) : अध्यक्ष डॉ. वाय. के. अलाघ

उद्देश : सहकारी स्तरावर व्यवसाय करणाऱ्या संस्थांचे खाजगी क्षेत्रातील कंपन्याप्रमाणे कंपनी अथवा निगमामध्ये रूपांतरण करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया के चौकट ठरविणे,

अहवाल सादरीकरण १५ मार्च २०००

भारतातील सहकारी क्षेत्राचा आवाका पाहता सदर चळवळ आपल्या आकार आणि क्षमतेचा फायदा उठविण्यामध्ये बऱ्याच अंशी असफल झालेली आहे. यातून असे लक्षात येते की सहकारी संस्थांच्या कारभारावरील सरकारी व कायदेशीर बंधने तसेच खाजगी क्षेत्रांमध्ये असणारी उद्देश निश्चिती, नियोजन, नियंत्रण, दूरदृष्टी आणि सक्षम नेतृत्व यांचा सहकारी क्षेत्रापुढे असणारा अभाव इत्यादींमुळे सहकार क्षेत्राची दयनीय अवस्था झालेली आहे.

सदर परस्थितीवर सहकार क्षेत्रातील एक नेतृत्व डॉक्टर कुरियन यांनी मत व्यक्त करताना सहकार क्षेत्रात असणाऱ्या जुन्या व नव्याने स्थापन होणाऱ्या सहकारी संस्थांची सहकारी निगम अथवा कंपनी म्हणून कंपनी अधिनियमाखाली नोंदणी करण्याची व त्याद्वारे सहकारी संस्थांना त्यांच्या प्रतिस्पर्धक असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील संयुक्त भांडवली संस्थाप्रमाणेच कायदेशीर व नियंत्रणदृष्ट्या कामकाज स्वातंत्र्य देण्याची उपाययोजना सुचविली. सदर मताला अनुसरून तत्कालीन प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अलाघ समितीची स्थापना केली. जिने या विषयावर सादर केलेल्या शिफारशी खालीलप्रमाणे

अलाघ समितीच्या शिफारशी :

१. सहकारी तत्त्वे व पारस्परिक मदत यांच्या आधारावर उत्पादन कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांच्या स्वत:हून कंपनी अथवा निगम रूपात परिवर्तन करण्यासाठी, कंपनी अधिनियमानुसार खाजगी, सार्वजनिक, विश्वस्त किंवा निधी अशा कोणत्याही स्वरूपात सहकारी संस्थांची निर्मिती व नोंदणी यासाठी उदार स्वरूपाची कायदेशीर व नियामक चौकट पुरविणे, सदर सुविधा ही एकापेक्षा जास्त राज्यांत कार्यरत राहू इच्छिणाऱ्या बहुराज्य सहकारी संस्थासाठी असेल.

२. सहकारी संस्थांची रूपांतरणाची प्रक्रिया होताना संस्था सदस्यांचे भागभांडवलही रूपांतरित होईल. परंतु त्याची सार्वजनिक रूपात पैसा किंवा वित्त बाजारात खरेदी-विक्री करता येणार नाही. सहकारी संस्थांचे राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांद्वारे अधिग्रहणसुद्धा करता येणार नाही.

३. सहकारी संस्था सदस्यांच्या भांडवलाचे हस्तांतरण फक्त निर्देशक मंडळाच्या मंजुरीनेच होऊ शकेल.

४. आंतरराज्यीय सहकारी संस्थांचे कंपनीत रूपांतरण हे सदर ठरावास संस्थेच्या सदस्यांनी मतदानाद्वारे मंजुरी दिल्यानंतरच होऊ शकेल.

५. नव्या रूपात स्थापित संस्था ही उत्पादक कंपनी म्हणूनच निर्देशित होईल. मूळ उत्पादन वा त्याच्याशी निगडित व्यक्तीच फक्त अशा कंपनीच्या मालकीत सहभागी होऊ शकतील हे दर्शविण्यासाठी ही उपाययोजना केली जाईल.

६. निगडित प्राथमिक वस्तूंचे उत्पादन, प्रक्रिया, निर्मिती व विक्री हे कार्य असणारी संस्था अशा प्रकारे या संस्थांच्या उद्देशाची व्याख्या राहील.

७. रूपांतरित झालेल्या संस्थेस मूळ स्वरूपात परत जाण्याची तरदूत असेल.

८. रूपांतरित उत्पादक संस्थांना वित्तीय व प्रशासकीय निर्णयात स्वायत्तता असेल व त्यासाठी निबंधकाच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही.

५. कपूर समिती (२०००) : अध्यक्ष जगदीश कपूर

उद्देश : सहकारी संस्था स्वतंत्र स्वावलंबी, स्वायत्त आणि सदस्य-चालित म्हणून विकसित होण्यासंदर्भात शिफारशी करणे.

कार्य आढावा : सातत्याने दुबळया होत चाललेल्या सहकारी चळवळीच्या परिस्थितीचे आकलन करून भारतातील सहकारी क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविणे हे सदर समितीचे कार्य होते.

भारतातील सहकारी क्षेत्रासंदर्भात कपूर समितीने मांडलेली काही प्रमुख निरीक्षणे खालीलप्रमाणे

1. समितीचे प्रमुख निरीक्षण असे होते की भारतातील सहकारी संस्थांनी त्यांचे लोकशाहीच्या मार्गाने चालणाऱ्या संस्था हे वैशिष्ट्य गमावले असून, त्या आता शासनाद्वारे नियंत्रित नोकरशाही पद्धतीने चालणाऱ्या संस्था बनल्या आहेत.

२. सहकारी संस्था अनावश्यक आणि अत्याधिक सरकारी नियंत्रण व नियमनाखाली कार्य करीत आहेत.

३. सहकारी चळवळीत प्रामुख्याने पतपुरवठा क्षेत्रात तळागाळातील स्तरावर काम करणाऱ्या सहकारी संस्था कमकुवत असून त्या लहान आकार, पायाभूत सुविधांची कमतरता, अकार्यक्षमता तसेच संरचनात्मक दोषांपासून ग्रस्त आहेत.

४. सहकारी संस्थांच्या कार्यात लोकशाही व्यवस्थापन पद्धतीचा अभाव आहे.

वरील निरीक्षणांना अनुसरून सहकारी क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी आणि विकासासाठी कपूर समितीने केलेल्या काही प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे

१. सहकारी क्षेत्रावरील अत्याधिक सरकारी नियंत्रण आणि नियमन कमी करून त्यांना सहकारी तत्त्वानुसार काम करून विकसित होण्यासाठी वाव देणे.

२. सहकार क्षेत्राच्या विकासासाठी आणि सहकारी क्षेत्रातील संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी सहकारी पुनवर्सन आणि विकास निधी निर्माण करणे.

३. सहकारी क्षेत्रातील संस्थांची सदस्य संख्या आणि व्यवसाय प्रमाण वाढीद्वारे, सहकारी क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे.

४. सहकारी संस्थांचे कार्य लोकशाही व्यवस्थापन पद्धतीने पार पाडण्यासाठी सहकारी संस्थांच्या कार्यात रस असणाऱ्या स्थानिक नेतृत्वाच्या विकासासाठी प्रयत्न करणे व अशा नेतृत्वाला चालना देणे.

५. सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत व्यावसायिक दृष्टिकोणाची निर्मिती करणे, संस्थांच्या कार्याचे विविधीकरण आणि विस्तारीकरण करणे, संस्थांची वसुली यंत्रणा सक्षम करणे, सहकारी संस्थांत कार्य करणाऱ्या मनुष्यबळाच्या प्रशिक्षण आणि विकासाकडे लक्ष देणे तसेच सहकारी संस्थांकडील निधीचे योग्य व्यवस्थापन होईल याची निश्चिती करणे.

६. विखे पाटील समिती (२००१) : अध्यक्ष श्री. विखे पाटील

उद्देश: कपूर समितीच्या शिफारशीनुसार सहकारी क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी द्यावयाच्या मदत निधीमधील केंद्राचा आणि राज्याचा हिस्सा ठरविणे व त्या संबंधी योग्य शिफारशी करणे.

कार्य आढावा : व्यवहार्य आणि संभाव्यता व्यवहार्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना विशेष आर्थिक मदत करून त्याद्वारे त्यांचा भांडवली पाया मजबूत करणे. त्यांच्या संचित तोट्याचे प्रमाण कमी करणे तसेच बँकांच्या येणी कर्जाची योग्य प्रकारे पुनर्रचना करणे याबद्दल समितीने सूचना केली होती.

७. व्यास समिती (२०००) : अध्यक्ष प्रो. व्ही.एस. व्यास

उद्देश : भारतातील ग्रामीण पतपुरवठा रचनेचा समग्र आढावा घेणे आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक दृष्टिकोण आणि रणनीतीची शिफारस करणे.

कार्य आढावा : ग्रामीण पतपुरवठ्याची जबाबदारी असणारी शीर्ष संस्था म्हणून कार्यरत भारतीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक अर्थात, नाबार्डने ऑगस्ट, २००० मध्ये प्राध्यापक व्यास यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण कृषी पतपुरवठा संदर्भात सर्वकष |आढावा घेण्यासाठी विशेष तज्ज्ञ समिती गठित केली. ग्रामीण पतपुरवठ्यात अग्रणी भूमिका पार पाडणाऱ्या सहकारी क्षेत्रासंदर्भात समितीने केलेली निरीक्षणे व त्यावर आधारित महत्त्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे

१. ग्रामीण पतपुरवठ्यातील सहकारी क्षेत्राचे महत्त्व समितीने प्रामुख्याने अधोरेखित केले असून ग्रामीण पतपुरवठा परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सहकारी पतपुरवठा क्षेत्राच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता समितीने आपल्या शिफारशीत ठळकपणे मांडली आहे.

२. सहकारी क्षेत्रातील बँका तसेच इतर वित्तीय संस्थांनी कृषिक्षेत्राला करण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजदर कमी करावेत, असे समितीने नमूद केले असून त्याच वेळी सहकारी क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांना ठेवींवर मोजाव्या लागणाऱ्या जास्तीच्या व्याजदराबाबत चिंता व्यक्त केली आहे.

३. ग्रामीण पतपुरवठा संरचनेत तळातील स्तरावर कार्यरत प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे आवश्यक असल्याचे समितीने अधोरेखित केले आहे.

४. सहकारी संस्थांची स्वायत्तता आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी ब्रह्म प्रकाश समितीने निर्देशित केलेला आदर्श सहकारी कायदा सर्व राज्यांनी स्वीकारण्याची शिफारस समितीने केली आहे.

५. अल्पकालीन पतपुरवठा करणाऱ्या संस्थांना दीर्घकालीन पतपुरवठा करण्याची परवानगी देण्याची शिफारस समितीने केली आहे.

६. सहकारी क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी कपूर समितीने शिफारस केल्यानुसार राज्य आणि केंद्र सरकारने सहकारी क्षेत्राला आवश्यक आर्थिक आणि इतर संसाधनांचा पुरवठा करण्याची शिफारस समितीने केली आहे.

८. वैद्यनाथन समिती (२००४) : अध्यक्ष ए. वैद्यनाथन

उद्देश : १. ग्रामीण सहकारी बँकिंग क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी यापूर्वी स्थापित समित्यांच्या शिफारशी विचारात घेऊन अंमलबजावणीयोग्य उपाययोजना सुचविणे,

२. सहकारी पतपुरवठा संस्था कार्यकलापासंबंधी योग्य नियमन चौकटव निगडित कायद्यांमध्ये आवश्यक बदल सुचविणे.

३. सहकारी बँकिंग संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक आर्थिक मदतीचे मूल्यांकन करणे तसेच अशा मदतवाटपाचा मार्ग, टप्पे आणि वाटप आकृतिबंध ठरविणे.

४. ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्यक्षमता आणि व्यवहार्यता सुधारण्यासाठी इतर उपाययोजना सुचविणे.

कार्य आढावा: वैद्यनाथन कृती समितीने सहकारी पतपुरवठा क्षेत्रातील शिखर संस्था, सहकारी पतपुरवठा क्षेत्राच्या कार्यासंबंधी उपलब्ध अद्ययावत सांख्यिकी माहिती तसेच या क्षेत्राचे नियमन करणाऱ्या विविध संस्था व कायदे यांचा अभ्यास करून सहकारी पतपुरवठा क्षेत्राच्या स्थिती व पुनरुज्जीवनासंबंधी खालीलप्रमाणे आपली निरीक्षणे नोंदविली.

१. सहकारी पतपुरवठा संस्थांचा भांडवली पाया मजबूत करण्यासाठी व त्यांचा संचित तोटा भरून काढण्यासाठी विशेष आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.

२. लोकशाही तत्त्वाने चालणारी सभासदांद्वारे संचलित आणि स्वावलंबी स्वरूपातील संस्था निर्मितीसाठी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या संस्थात्मक स्तरावरील पुनर्रचनेची गरज आहे.

३. सहकारी बँकांच्या आर्थिक व्यवस्थापन धोरणासंबंधित, भारतीय रिझर्व्ह बँकेने आवश्यक तेथे प्रत्यक्ष हस्तक्षेप यांदित कारवाई करण्याच्या दृष्टीने कायदेशीर चौकटीत मूलगामी बदलांची गरज आहे.

४. सहकारी पतपुरवठा रचनेतील सर्व स्तर आणि पातळीवर कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांत क्षमतानिर्मिती तसेच इतर माध्यमांद्वारे गुणात्मक सुधारणा करणे आवश्यक आहे. ज्यामुळे कर्मचाऱ्यांची व एकूण क्षेत्राची कार्यक्षमता वाढू शकेल.

आर्थिक मदत व वित्तीय पुनर्रचनेच्या/ अनुषंगाने दिलेल्या वैद्यनाथन समितीच्या शिफारशी :

१. सहकारी बँका आणि पतपुरवठा संस्थांचा भांडवली पाया मजबूत करण्यासाठी कार्यक्षम संस्थांना राज्य व केंद्र शासनातर्फे प्रत्यक्ष आर्थिक साहाय्य करणे.

२. सहकारी संस्थांतील भांडवलनिवृत्तीद्वारे सदर क्षेत्रातील शासकीय हस्तक्षेप कमी करणे.

३. देशांतर्गत पतरचनेतील पतसंस्थांची कार्यक्षमता वाढवणे.

४. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण सनदी लेखापरीक्षकामार्फत करणे.

५. संगणकाधारित सामायिक लेखा प्रणालीचा विकास व वापर सहकारी क्षेत्रासाठी करणे.

संस्थात्मक, नियमनात्मक आणि कायद्यातील सुधारणांविषयक शिफारशी :

१. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळात किमान पात्रतेवर आधारित योग्य व्यक्तींचा समावेश निश्चित करणे व त्यासाठी बँकिंग नियमन कायद्यात आवश्यक सुधारणा करणे.

२. नाबार्डला जास्तीचे अधिकार देऊन सहकारी संस्थांचे पर्यवेक्षण कार्य करण्यासाठी सशक्त करणे.

३. सहकारी संस्था राजकीय व सरकारी हस्तक्षेपापासून दूर ठेवणे.

४. सहकारी बँकांच्या कारभारात आवश्यकतेनुसार रिझर्व्ह बँकेला प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचे अधिकार देणे.

५. सहकारी बँकांसाठी सहकारी संस्था कायद्यात स्वतंत्र प्रकरणाचा समावेश करणे.

६. सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे तसेच कामातील तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे.

७. पतपुरवठा क्षेत्रातील संस्थांना पतपुरवठाविषयक संस्थात्मक रचनेतील सहभाग व त्यांची आर्थिक धोरणे ठरविण्याचे स्वातंत्र्य देणे.

८. इतर महत्त्वाच्या शिफारशी :

(अ) संस्थेतील ठेवीदारांना सभासदाचा दर्जा देणे.

(ब) ब्रह्म प्रकाश समितीने सुचविलेल्या प्रारूपानुसार राज्यांनी आदर्श सहकारी संस्था कायदानिर्मिती करणे.

(क) निवडणुकीद्वारे संस्था संचालक मंडळाची नेमणूक. ज्यात शासनाचे प्रतिनिधी नसतील.

(ड) सहकारी बँकांच्या मुख्य कार्यकारीपदी व्यावसायिक व पात्र व्यक्तीची नेमणूक तर प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांत प्रशिक्षित चिटणिसाची नेमणूक.

(इ) संचालक मंडळाची भूमिका धोरणात्मक बाबतींतच मर्यादित ठेवणे.

९. सहकारावरील उच्चाधिकार समिती (२००४) : अध्यक्ष श्री. शिवाजीराव पाटील

उद्देश समितीने आपले कामकाज खालील उद्देशाच्या दृष्टिकोणातून करावयाचे होते.

१. सहकार क्षेत्राच्या मागील शंभर वर्षांतील उपलब्धींचा आढावा घेणे.

२. बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार सहकार क्षेत्रापुढील आव्हाने ओळखणे व त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. सहकारी क्षेत्राचे लोकतांत्रिक, स्वायत्त व व्यावसायिक कामकाजास सुनिश्चित करण्यासाठी देशातील सहकारी कायद्यामध्ये उपयुक्त नीती, कायदेशीर चौकट व विधायक बदल सुचविणे, तसेच बहुराज्य सहकारी सोसायटी अधिनियम, २००२ मध्ये संशोधन करणे.

४. समितीद्वारा विचारार्थ आवश्यक असा इतर कोणताही आकस्मिक अथवा परिणामकारक मुद्दा.

कार्य आढावा : भारतात सन २००४ मध्ये सहकारी चळवळीची १०० वर्षे पूर्ण होत असताना, सहकारी क्षेत्राच्या सदृढीकरणासाठी व त्यात कालानुरूप योग्य बदल करण्यासाठी तसेच जागतिक स्तरावर निर्मित होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि सहकारी क्षेत्राच्या पुढील मार्ग निश्चितीसाठी भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाने सन २००४ मध्ये सहकारावरील उच्चाधिकार समितीची स्थापना केली. सदर समितीने केलेल्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे –

१. राष्ट्रीय स्तरावरील एकाच आदर्श सहकारी कायद्याची निर्मिती

२. सहकारी संस्थांना आर्थिक संस्था म्हणून कायदेशीर मान्यता देणे.

३. सक्रिय सदस्य व्याख्येचा कायद्यात समावेश करणे,

४. निर्देशक मंडळाच्या परिणामकारकतेसाठी शिफारशी

५. सहकारी संस्थांचे राजकीयीकरण टाळण्यासाठी शिफारशी

६. सहकारी संस्थांची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी शिफारशी

७. संविधान संशोधनविषयक शिफारशी

८. शासनाच्या भूमिकेबद्दल शिफारशी

९. भांडवल उभारणी व वित्तीय स्थिरतेसाठी शिफारशी

१०. सहकार क्षेत्राच्या विकासासाठी इतर उपाययोजनांच्या शिफारशी